41 12/2015-16

अ.भा.से.(कार्य मुल्यांकन अहवाल) नियम, २००७ प्रमाणे सन २०१५-१६ मध्ये भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी करुन घ्यावयाच्या वैद्यकीय तपासणीबाबत........

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

## शासन निर्णय क्रमांकः भाप्रसे-२०१५/प्र.क्र. २५०/२०१५/९

मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

तारीख: १३.०१.२०१६

**प्रस्तावना -**

अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ हे नियम भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांसाठी, सन २००७-०८ या वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत. या नियमांप्रमाणे ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या भा.प्र.से. अधिकाऱ्यांनी वरील नियमानुसार विहित केलेल्या वैद्यकीय तपासण्या प्रतिवर्षी करुन घेणे बंधनकारक असून, त्यांच्या वैद्यकीय तपासणीच्या अहवालाचा सारांश, वार्षिक कार्यमूल्यांकन अहवालासोबत जोडणे आवश्यक आहे. सन २०१५-१६ या वर्षी राज्यातील ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या भाप्रसे अधिकाऱ्यांची अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ नुसार विहात केलेली वैद्यकीय तपासणी करण्यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय -**

अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील नियम ३ व त्यासोबतचा नमुना ४ अनुसार, दिनांक ३१.०३.२०१५ रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या राज्यातील भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी, त्यांची विहित वैद्यकीय तपासणी, चालू वर्षी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये नमूद केल्यानुसार महसुल विभागनिहाय निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयातून करुन घ्यावी. सदर वैद्यकीय तपासणी करताना खालील सुचनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१. महाराष्ट्र राज्य संवर्गातील दि.३१.०३.२०१५ रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या भा.प्र.से. अधिकाऱ्यांनी ते कार्यरत असलेल्या महसुली विभागासाठी प्रपत्र-अ मध्ये दर्शविलेल्या खाजगी रुग्णालयातून/वैद्यकीय संस्थांमधून प्रपत्र-ब मध्ये नमूद केलल्या सर्व वैद्यकीय तपासण्या चालू वर्षी (सन २०१५-२०१६) करुन घ्याव्यात.

२. अमरावती महसुल विभागात कार्यरत असलेल्या भाप्रसे अधिकाऱ्यांनी त्यांना जवळ असणाऱ्या इतर महसूली विभागासाठी निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयांतून सदर वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी. तसेच प्रपत्र-ब मध्ये विहित केलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या करण्याची सुविधा उपलब्ध असलेल्या संबंधित जिल्ह्यातील शासकीय रुग्णालये अथवा महसूली विभागातील शासकीय/महानगरपालिका रुग्णालयांमध्ये देखील वैद्यकीय तपासणी करुन घेता येईल.

३. भा.प्र.से. अधिकाऱ्यांनी त्या-त्या महसुली विभागासाठी नेमलेल्या रुग्णालयांतून अथवा शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालयांमधून प्रपत्र-ब मध्ये दर्शविलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या करुन घेतल्यानंतर सदर रुग्णालयाला वैद्यकीय चाचण्यांसाठी आवश्यक असलेली रक्कम प्रथम स्वत:अदा करावी व त्याची प्रतिपूर्ती आपल्या कार्यालयातून मिळवावी. या शासन निर्णयान्वये वार्षिक वैद्यकीय तपासणीच्या खर्चाची प्रतिपूर्ती घेणाऱ्या अधिकाऱ्यांना, शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक एमएजी-१०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य-३, दिनांक ३१ ऑगस्ट, २००६ अन्वये दर दोन वर्षातून एकदा अनुज्ञेय असलेली वैद्यकीय तपासण्यांवरील खर्चाची प्रतिपूर्ती देय राहणार नाही.

४. **या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३१ मार्च, २०१६** पर्यंतच्या कालावधीत भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी संबंधित खाजगी रुग्णालयांशी परस्पर संपर्क साधून, वैद्यकीय तपासणीच्या तारखा निश्चित करुन घ्याव्यात व प्रपत्र-ब मध्ये विहित केलेली वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी.

५. शासनाने वैद्यकीय तपासणीसाठी निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयांनी तसेच शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालयांनी त्यांचेकडील भा.प्र.से. अधिकाऱ्यांचे वैद्यकीय तपासणीचे एकत्रित अहवाल कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-(कार्यासन ९), मंत्रालय, मुंबई - ३२ या पत्त्यावर पाठवावेत. तसेच वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर प्रस्तुत तपासणी अहवालाची एक प्रत संबंधित भा.प्र.से. अधिकाऱ्यांनाही दयावी.

६. प्रपत्र -ब मध्ये दर्शविलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या एकाच ठिकाणी व एकाच दिवशी करण्यात येतील. परंतु अपवादात्मक प्रकरणी काही कारणास्तव सर्व तपासण्या एका दिवसात करणे शक्य न झाल्यास, लगतच्या दुसऱ्या दिवशी त्या करुन घ्याव्यात. भाप्रसे अधिकारी आणि संबंधित रुग्णालये, यांनी तपासणीचा दिनांक व वेळ परस्पर ठरवून घ्यावी. तसेच भाप्रसे अधिका-यांनी वैद्यकीय तपासण्यांसाठीची पूर्वतयारी/खबरदारी सुध्दा (precautions) रुग्णालयाच्या सल्ल्याने घ्यावी.

७. वैद्यकीय तपासण्यांचा १ दिवस हा कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यात येईल.

८. वैद्यकीय तपासणीचा कालावधी हा कर्तव्य कालावधी समजल्यामुळे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी अन्यथा दौऱ्यावर असतांना, त्यांना ज्या दराने प्रवासभत्ता/दैनंदिन भत्ता दिला जातो, त्या दराने तो (लागू असल्यास) देय राहील. असा प्रवास भत्ता/दैनिक भत्ता यांचे

दर, वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, देय राहतील. याबाबतची परिगणना संबंधित अधिकाऱ्यांना वेतन प्रदान करणाऱ्या कार्यालयाने करुन त्यांचे प्रदान करावे.

९. वैद्यकीय तपासणीस जाण्यापूर्वी अधिकाऱ्यांनी, त्यांच्या लगतच्या वरिष्ठ अधिका-यास, ते वैद्यकीय तपासणीसाठी मुख्यालयात अथवा मुख्यालयाबाहेरील रुग्णालयात जाणार असल्याबाबतची पूर्वकल्पना द्यावी.

१०. वैद्यकीय तपासणीसाठी होणारा खर्च, संबंधित अधिकाऱ्याच्या आस्थापनेवरील वेतन व भत्त्यांसाठी लागू असलेल्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या वर्षासाठीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. मात्र यासाठी आर्थिक वर्षाचे बंधन रहाणार नाही.

हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १७०/१५/सेवा-५, दि. २१.१२.२०१५ अन्वये मिळालेल्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेताक क्रमांक २०१६०११३१२४६५८८६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pranali Ulhas Gosavi

Digitally signed by Pranali Ulhas Gosavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=193e87f0b8c5f58941e4d2fbfdb3458deab3864a976f06d3984c8149bb888d55, cn=Pranali Ulhas Gosavi
Date: 2016.01.13 16:05:31 +05'30'

**(प्रणाली गोसावी)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
७. महाराष्ट्र संवर्गातील ४० वर्षे वयावरील भारतीय प्रशासकीय सेवेतील सर्व अधिकारी,
८. प्रपत्र-अ मधील सर्व खाजगी रुग्णालये,
९. सर्व शासकीय, महानगरपालिका रुग्णालयांचे अधिष्ठाता/जिल्हा शल्य चिकित्सक
१०. निवड नस्ती

शासन निर्णय क्र. : भाप्रसे-२०१५/प्र.क्र.२५०/२०१५/९, दिनांक १३.०१.२०१६ चे सहपत्र

प्रपत्र-अ

| अ.क्र | विभाग आणि त्याखालील जिल्हे | भा.प्र.से.अधिकाऱ्यांची तपासणी करुन घेण्याकरिता निश्चित केलेले रुग्णालयाचे नाव व संपर्क अधिकारी व दूरध्वनी क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | रुग्णालयाचे नाव | संपर्क अधिकारी व दूरध्वनी क्रमांक |
| १. | **मुंबई / कोकण विभाग**<br>मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग | **दि अपोलो क्लिनिक, कुलाबा,मुंबई** | डॉ. हिराल मनियार<br>Hosp.-०२२-२२०२११६६<br>Mob- ८४५०९८२२२५ |
| २. | **पुणे विभाग**<br>सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, सोलापूर | **रुबी हॉल क्लिनिक,**<br>४०, ससून रोड,<br>पुणे-४११ ००१ | श्रीमती हंसा कोटक,<br>वरीष्ठ व्यवस्थापक, वैद्यकीय सेवा<br>Mob.:- ९४२२३१०५०५<br>Hos.-०२०-६६४९९४९/६६४५५१०० |
| ३. | **नागपूर विभाग**<br>नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, वर्धा | **शुअरटेक (जुने अपोलो) हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर लि.**, १३-ए, बॅनर्जी मार्ग, धांतोली नागपूर-४४००१२ | डॉ. हेमा ढोबळे, वैद्यकीय अधिक्षक<br>Mob.-९८९०१८८८५३<br>Hos.-०७१२-६६३६८६३/८००/८०१<br>Fax-०७१२-६६४०५४३ |
| ४. | **नाशिक विभाग**<br>नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर | **सुयश मेडीकल फाऊंडेशन प्रा.लि., सुयश हॉस्पिटल,**<br>अहिल्याबाई होळकर मार्ग, महामार्ग बस स्टँड शेजारी, मुंबई नाका, नाशिक | डॉ. हेमंत ओस्तवाल<br>व्यवस्थापकीय संचालक<br>Mob.-९४२२२५८७७७<br>Hos.-०२५३-२३१८९९०/९१/९३ |
| ५. | **औरंगाबाद विभाग**<br>औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर , उस्मानाबाद | **एम.जी.एम. मेडिकल सेंटर ॲण्ड रिसर्च इंस्टिट्यूट औरंगाबाद** | डॉ. अजय शिंदे<br>रुग्णालय प्रशासक<br>Mob.-९८२३४९९९९४<br>Hos.-०२४०-६६०११०० |
| ६. | **अमरावती विभाग**<br>अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम | अमरावती विभागात कार्यरत संबंधित भाप्रसे अधिकाऱ्यांनी त्यांना जवळ असणाऱ्या इतर महसूली विभागातील रुग्णालयांतून सदर वैद्यकीय चाचण्या करुन घ्याव्यात. | |

प्रपत्र 'ब'

**Annexure**

**From IV**

[See Rule 3]

**(Details of the medical tests to be conducted)**

Date:

Name: Age: Years Sex: M/F

A. **Investigations Reports**

| | |
|---|---|
| 1. | **(a) Haemogram**<br>(i) Haemoglobin<br>(ii) TLC (Total Leukocyte Count)<br>(iii) DLC (Differential Leukocyte Count)<br>(a) Polymorphs<br>(b) Lymphocytes<br>(c) Eosinophils<br>(d) Basophils<br>(e) Monocytes<br>(iv) Peripheral Smear<br>**(b) Thyroid Profile**<br>i) T3<br>ii) T4<br>iii) TSH<br>**(c) Vit.B12 test**<br>**(d) Vit. D3 test** |
| 2. | **Urine Examination**<br>(i) Colour<br>(ii) Albumin<br>(iii) Sugar<br>(iv) Microscopic Exam<br>**Stool routine** |
| 3. | **Blood Sugar**<br>(i) Fasting<br>(ii) Post-Prandial |
| 4. | **Lipid Profile**<br>(i) Total Cholesterol<br>(ii) HDL Cholesterol (High Density Lipoprotein Cholesterol)<br>(iii) LDL Cholesterol ( Low Density Lipoprotein Cholesterol)<br>(iv) VLDL Cholesterol ( Very Low Density Lipoprotein Cholesterol)<br>(v) Triglycerides |
| 5. | **Liver Function Tests**<br>(i) S. Bilirubin (Total) (Serum Bilirubin)<br>(ii) S. Bilirubin (Direct) (Serum Bilirubin)<br>(iii) S.G.O.T. (Serum glutamic oxaloacetic transaminase)<br>(iv) S.G.P.T. (Serum glutamic pyruvic transaminase)<br>(v) Australia Antigen Test (Hepatitis B) |

| | |
|---|---|
| 6. | **Kidney Function Tests**<br>(i) Blood Urea<br>(ii) S. Creatinine (Serum Creatinine)<br>(iii) S. Uric Acid (Serum Uric Acid)<br>(iv) Na+ (sodium)<br>(v) K (Potassium)<br>(vi) calcium<br>(vii) Inorganic Phosphorus |
| 7. | **(A) Cardiac Profile**<br>(i) S.LDH (Serum Lactate dehydrogenase)<br>(ii) CK-MB (Creatinine Kinase- muscle binding)<br>(iii) S.CRP (Serum C- Reactive Protein)<br>**(B) For Men**<br>(v) PSA (Prostate Specific Antigen test)<br>**(C) For Women**<br>(vi) PAP SMEAR ( Papanicolaou test) |
| 8. | X-Ray-Chest PA View Report |
| 9. | ECG Report (Electro Cardiogram Report) |
| 10 | USG Abdomen Report ( Ultrasonography Abdomen Report) |
| 11. | TMT Report (Treadmill test)/Stress test |
| 12. | Mammography Report (Women) |
| 13. | **Gynaecological Health Check Up**<br>(i) Pelvic Examination<br>(a) Local Examination<br>(b) Per Vaginum (P/V)<br>(c) Per Speculum<br>(ii) Surgical Examination<br>(iii) Breast Examination |
| 14. | (i) Urological Examination (For Men Only)<br>(ii) Rectal Examination (For Men Only) |
| 15. | **Systemic Examination**<br>(i) Resp. System (Respiratory System)<br>PFT (Pulmonary Function test)<br>(ii) CVS (Cardiovascular System)<br>(iii) Abdomen<br>(iv) CNS (Central Nervous System)<br>(v) Locomotor System<br>(vi) Dental Examination |
| 16. | **Eye Examination**<br>(i) Distant Vision<br>(ii) Vision with Glasses<br>(iii) Colour Vision<br>(iv) Tonometry<br>(v) Fundus Examination |

| | |
|---|---|
| 17. | ENT<br>(i) Oral Cavity<br>(ii) Nose<br>(iii) Throat<br>(iv) Larynx |

B. **Medical Report of the Officer**

| | | |
|---|---|---|
| 1. | Haemoglobin level of the officer | Normal/Low |
| 2 | Blood Sugar Level | Satisfactory/Normal/High/Low |
| 3 | Cholesterol level of the officer | Normal/High/Low |
| 4 | Liver functioning | Satisfactory/normal/dysfunctioning |
| 5 | Kidney Status | Normal/Both-one kidney not functional optimally |
| 6 | Cardiac Status | Normal/enlarged/blocked/not normal |

C: **Summary of Medical Report (only copy of this part is to be attached to PAR)**

| | | |
|---|---|---|
| 1. | Overall Health of the Officer | |
| 2. | Any other remarks based on the health medical check up of the officer | |
| 3. | Health profile grading | Excellent/Very Good/Good/Average |

Date:

Signature of Medical Authority

Designation: